# इचलकरंजी महानगरपालिका

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा, २०२३

- सन 2023 च्या गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

- स्पर्धेत सहभागी होण्यास इच्छुक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.ploa@gmail.com या इमेलवर दि. 05.09. 2023 पूर्वी ऑनलाइन अर्ज करावेत.

- स्पर्धेचे निकष, अर्जाचा नमुना, गुणांकन पद्धती, बक्षिसाचा तपशील इ. बाबतचा शासन निर्णय महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच नोटीस बोर्ड वर उपलब्ध आहे.

**राज्यातील सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ बक्षिसे**

**प्रथम क्रमांक बक्षिस**
रु. 5,00,000/-

**द्वितीय क्रमांक बक्षिस**
रु. 2,50,000/-

**तृतीय क्रमांक बक्षिस**
रु. 1,00,000/-

**जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ बक्षिस**

**बक्षिस**
रु. 25,000/-



https://ichalkaranjimnp.in/

Edit : Rushikesh Pawale

**सन २०२३ च्या गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पुलदे २०२३/प्र.क्र.१/सां.का.२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ जुलै, २०२३

**प्रस्तावना :**

सन २०२२ मधील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात आले होते. त्याच अनुषंगाने सन २०२३ मध्ये राज्यातील सार्वजनिक उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

दि.१९.९.२०२३ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याकरीता येणाऱ्या रु.२४,६०,००० (रुपये चोवीस लाख साठ हजार फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी कार्यपध्दत पुढीलप्रमाणे राहिल :-

२.१. या शासन स्पर्धेत, धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना सहभागी होता येईल. सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची पुरस्कारासाठी निवड पुढील निकषांच्या आधारे करण्यात येईल:-

| अ.क्र. | गुणांकनासाठी बाब | गुणांक |
|---|---|---|
| १. | पर्यावरणपुरक मूर्ती | १० |
| २. | पर्यावरणपुरक सजावट (थर्माकोल/प्लॅस्टीक विरहीत) | १५ |
| ३. | ध्वनीप्रदुषण रहित वातावरण | ५ |
| ४. | पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्धा निर्मूलन, इ.समाज प्रबोधन / सामाजिक सलोखा संदर्भात सजावट/देखावा/*किंवा* | *२०* |
| | स्वांतत्र्याच्या चळवळीसंदर्भात /छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्ताने सजावट/देखावा | *२५* |

| | | |
|---|---|---|
| ५. | गणेशोत्सव मंडळाने रक्तदान शिबीर, वर्षभर गडकिल्ले सवंर्धन, पर्यावरण रक्षण, सेंद्रीय शेती, सौर उर्जाबद्दल जागरुकता निर्माण करणे, ॲम्बुलन्स चालविणे, वैद्यकीय केंद्र चालविणे इ. सामाजिक कार्य (अनु. क्र. ६ व ७ व्यतिरिक्त) | २० |
| ६. | शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक, आरोग्य, इत्यादीबाबत केलेले कार्य | १५ |
| ७. | महिला, ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या शैक्षणिक/ आरोग्य/ सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य | १५ |
| ८. | पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रम/स्पर्धा | १० |
| ९. | पारंपारिक/ देशी खेळांच्या स्पर्धा | १० |
| १०. | गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा उदा. पाणी/ प्रसाधनगृह, वैद्यकीय प्रथमोपचार, वाहतुकीस अडथळा येणार नाही असे आयोजन, आयोजनातील शिस्त, परिसरातील स्वच्छता (प्रत्येक सुविधेस ५ गुण) | २५ |
| | एकूण | १५० |

टीप - अनु. क्र. ४ बाबत देखाव्याप्रमाणे २० किंवा २५ गुण दयायचे आहेत.

२.२. वरील बाबींची पुर्तता करणाऱ्या/करु शकणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने करावयाच्या अर्जाचा नमुना या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट “अ”** येथे आहे.

२.३. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने,पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या इमेलवर **दि.१०.७.२०२३ ते दि.०५.०९.२०२३** पूर्वी ऑनलाइन अर्ज करावेत.

२.४. प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी प्राप्त झालेले जिल्हा निहाय अर्ज संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास **दि.०८.०९.२०२३ पूर्वी** उपलब्ध करुन द्यावेत. याकरीता प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र इमेल आयडी तयार करुन सदर इमेल आयडी प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना त्यांच्या वरील इमेलवर **दि.१५.०८.२०२३ पूर्वी** कळवावे.

२.५. विजेत्यांची निवड करण्यासाठी पुढीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती राहिल.

| | | |
|---|---|---|
| (१) जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी | - | अध्यक्ष |
| (२) शासकीय कला महाविद्यालयातील कला प्राध्यापक | - | सदस्य |
| (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी | - | सदस्य |
| (४) जिल्हयातील आरोग्य अधिकारी | - | सदस्य |
| (५) जिल्हयातील पोलीस अधिकारी | - | सदस्य |
| (६) जिल्हा नियोजन अधिकारी | - | सदस्य सचिव |

संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे वरील अधिकाऱ्यांची नियुक्ती व त्यांचे समन्वय करतील. उपरोक्त निवड समिती प्रत्यक्ष उत्सवस्थळी भेट देतील तसेच मंडळाकडून व्हीडीओग्राफी व कागदपत्र जमा करुन घेतील. जिल्हास्तरीय समितीकडून प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत अभिप्रायासह गुणांकन करण्यात येईल.सदर समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्हयातून प्रत्येकी ३ व अन्य जिल्हयातून प्रत्येकी १ उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची शिफारस करुन त्यांची नावे सर्व कागदपत्र व्हीडीओसह राज्य समितीकडे देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत, प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई यांना त्यांच्या mahotsav.plda@gmail.com या इमेलवर दि.०१.१०.२०२३ पर्यंत सादर करतील.

२.६. जिल्हास्तरीय समितीकडून शिफारस केलेल्या यादयांमधून ३ विजेते क्रमांक निवडण्यासाठी राज्य स्तरावर पुढीलप्रमाणे निवड समिती राहिल -

(१) सर जे.जे. कला विद्यालयाचे अधिष्ठाता / वरिष्ठ प्राध्यापक - अध्यक्ष

(२) पोलीस महासंचालक कार्यालयातील वरिष्ठ गट-अ मधील अधिकारी - सदस्य

(३) राज्य जनसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना - सदस्य सचिव

सदर दोन्ही समितीसाठी प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी हे समन्वयक असतील.

२.७. राज्यस्तरीय समिती ही जिल्हास्तरीय समिती मुंबई, मुंबई उपनगर,पुणे, ठाणे या ४ जिल्हयांतून प्रत्येकी ३ व अन्य जिल्हयातून प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ४४ प्राप्त शिफारशीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमधून गुणांकन व संबंधित कागदपत्राच्या आधारे पहिल्या ३ विजेत्यांची निवड करतील व त्यांचा अहवाल प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्याकडे दि.६.१०.२०२३ पर्यंत देतील.

२.८. राज्यातील पहिल्या ३ विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुढीलप्रमाणे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येईल.

| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|
| रु. ५,००,०००/- | रु.२,५०,०००/- | रु.१,००,०००/- |

राज्य समितीकडे जिल्हास्तरीय समितीने निवड केलेल्या ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी वरीलप्रमाणे ३ विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांस राज्य शासनाकडून प्रत्येकी रुपये २५,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

२.९. सर्व जिल्हाधिकारी तसेच माहिती जनसंपर्क महासंचालनालया अंतर्गत कार्यालयांनी सदर कार्यक्रम सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना अवगत होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

२.१०. निकालाचा दिनांक, सर्व विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा बक्षीस वितरणाचा समारंभ कोठे व कसा करायचा याबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील.

३. निवड समितीमध्ये असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना दैनिक भत्ता व प्रवास भत्ता शासनाच्या नियमानुसार अनुज्ञेय राहिल व त्यासाठी होणारा खर्च संबंधित कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चातून भागवावा.

४. यासाठी होणाऱ्या अंदाजे खर्च रु.२४,६०,०००(अक्षरी रुपये चोवीस लाख साठ हजार फक्त) याबाबतचा तपशील **परिशिष्ट 'ब'** मध्ये दर्शविला आहे. हा खर्च, मागणी क्रमांक "झेडडी-०२,२२०५ कला व संस्कृती(१०१)ललित कला शिक्षण (०७) कला अकादमी(०७)(०१)पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी( २२०५ १४६३)"-५० इतर खर्च (अनिवार्य) या लेखाशीर्षाखाली सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. यासाठी प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यासआहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग - पहिला, उपविभाग- तीन मधील, अनु क्र.४, परिच्छेद क्रमांक २७ (२) (अ)नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०७०४१६३११८२१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIDYA HEMANT WAGHMARE

Digitally signed by VIDYA HEMANT WAGHMARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=4e214bf8a250420c28c2084d8dd965c0d454568322bd41981d48971712e51795, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F93EFE7B946BF26FF989D6E5E01E1B122B9EB4E3E4E6799CB8E82B2D33D58DFC, cn=VIDYA HEMANT WAGHMARE
Date: 2023.07.04 18:49:39 +05'30'

**( विद्या वाघमारे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

६. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग,मंत्रालय,मुंबई
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०.सर्व पोलीस आयुक्त
११.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१२.सर्व विभागीय आयुक्त
१३.सर्व जिल्हाधिकारी
१४.सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१५.सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
१६.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई
१७.प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई
१८. अधिष्ठाता, सर जे. जे. कला महाविद्यालय, मुंबई
१९.राज्य जनसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र राज्य
२०.महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता )-१, महाराष्ट्र,मुंबई
२१.महालेखापाल ( लेखापरीक्षा )-१, महाराष्ट्र, मुंबई
२२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२४.निवड नस्ती (सां.का.२).

## परिशिष्ट “अ”

## राज्य शासन उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार २०२३ स्पर्धा

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने भरावयाचा अर्जाचा नमुना

| अनु.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| (१) | जिल्हा, तालुका | |
| (२) | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे नाव | |
| (३) | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी यांचे नाव व भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल | |
| (४) | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| (५) | उत्सव स्थळ | |
| (६) | धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या संस्था नोंदणी क्रमांक नोंदणीचे वर्ष किंवा स्थानिक पोलीसांची परवानगी घेतली असल्यास त्याचा तपशील किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी असल्यास त्याचा तपशील | |
| **स्पर्धेच्या गुणांकासाठी आवश्यक माहिती** | | |
| अ क्र | बाब | होय /नाही<br>व तपशील देण्यात यावा |
| १. | पर्यावरणपुरक मूर्ती आहे का | |
| २. | पर्यावरणपुरक सजावट (थर्माकोल/प्लॅस्टीक विरहीत) आहे का | |
| ३. | ध्वनीप्रदुषण रहित वातावरण आहे का | |
| ४. | पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्धा निर्मूलन, इ.समाज प्रबोधन / सामाजिक सलोखा संदर्भात सजावट/देखावा*किंवा* | |
| | स्वांतत्र्याच्या चळवळीसंदर्भात,/छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्ताने सजावट/देखावा | |
| ५. | गणेशोत्सव मंडळाने आयोजित केलेलेरक्तदान शिबीर, वर्षभरगड किल्ले सवंर्धन, पर्यावरण रक्षण, सेंद्रीय शेती, सौर उर्जाबद्दल जागरुकता निर्माण | |

| | | |
|---|---|---|
| | करणे, ॲम्बुलन्स चालविणे, वैद्यकीय केंद्र चालविणे इ. सामाजिक कार्यक्रम (अनु. क्र. ६ व ७ व्यतिरिक्त) | |
| ६. | शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक, आरोग्य, इत्यादीबाबत केलेले कार्य | |
| ७. | महिला, ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या शैक्षणिक/ आरोग्य/ सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य | |
| ८. | पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रम/स्पर्धा आयोजन आहे का | |
| ९. | पारंपारिक/ देशी खेळांच्या स्पर्धा आयोजन आहे का | |
| १०. | गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा उदा. पाणी/ प्रसाधनगृह, वैद्यकीय प्रथमोपचार, वाहतुकीस अडथळा येणार नाही याचे नियोजन, आयोजनातील शिस्त, परिसरातील स्वच्छता व्यवस्था केली आहे का | |
| ११. | अन्य काही माहिती दयायची असल्यास | |

आवश्यक ती कागदपत्र,कागदपत्रांना त्या त्या बाबीचा क्रमांक देऊन जोडली आहेत.

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे नमुद करण्यात आलेली माहिती ही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अभिलेख्यानुसार अचूक व खरी आहे. ही माहिती चुकीची किंवा खोटी आढळल्यास आमच्या मंडळाला स्पर्धेतून बाद केल्यास ते आम्हास मान्य राहील.

अध्यक्ष /सचिव/ कोषाध्यक्ष यांचे नाव स्वाक्षरी

**परिशिष्ट "ब"**

**सन २०२३ मध्ये राज्य शासनाकडून उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा अंदाजे तपशील**

| अ.क्र. | बाब | रुपये |
|---|---|---|
| १. | पारितोषिकाची रोख रक्कम | १८,७५,००० |
| २. | परीक्षकांना प्रमाणपत्र | २५,००० |
| ३. | स्वयंसेवक मानधन | ३०,००० |
| ४. | विजेत्यांना मानचिन्ह, | २५,००० |
| ५. | जाहिरात | २०,००० |
| ६. | पारितोषिक वितरण सोहळयाच्या वेळी सजावट,लाईट, साऊंड, पुस्तकभेट, सुत्र संचालन,फोटोग्राफी, यु टयुब लाईव्ह, रांगोळी | २,१५,००० |
| ७. | उपस्थित विजेत्या गटांना भोजन, अल्पोपहार | १,६०,००० |
| ८. | मनोरंजन कार्यक्रम | ४०,००० |
| ९ | अन्य आकस्मिक खर्च | ७०,००० |
| | **एकूण** | २४,६०,००० |

वरील रकमेत १५ % पर्यंत फेरफार करण्याचे अधिकार प्रकल्प संचालक यांना राहतील.

--